# प्रेस नोट

शनिपेठ पोलीस स्टेशन जळगाव
दिनांक 02/04/2025

प्रति

मा. संपादक

-------------------------------

विषय- रिक्षाचालकाचे रिक्षात हेतुपुरस्सर व सुडभावनेने अग्नीशस्त्र व जिवंत काडतुस ठेवणा-या इसमांना जेरबंद केलेबाबत

वरील विषयान्वये सादर आहे की दिनाक 28/03/2025 रोजी दुपारी 12.00 वा.सुमारास जळगाव शहरातील नेरी नाका येथे प्रवाशी ॲटोरीक्षा रजी.नंबर MH19CW6108 मध्ये देशी कट्टा व 02 जिवंत काडतुस मिळुन आल्याने सदर रिक्षाचालक नामे राहुल रंगराव पाटील रा.कुसुंबा ता.जि.जळगाव याचे विरुध्द भारतीय हत्यार कायदा कलम 3,25 अन्वये गुन्हा दाखल करुन त्यास अटक करग्यात आलेली होती. सदर गुन्ह्याचे तपासात असे निष्पन्न झाले की राहुल रंगराव पाटील याची पत्नी व कुसुंबा येथे राहणारा इसम नामे नितीन वसंत तायडे वय-25 वर्षे याचे दरम्यान अनैतिक संबंध असल्याचा संशय राहुल पाटील यास असल्याने राहुल पाटील व नितीन तायडे यांचे दरम्यान वारंवार वाद होत होते. राहुल पाटील याचेवर सुड उगविण्यासाठी व त्यास अवैध अग्नीशस्त्र बाळगल्याचे खोट्या गुन्हात अडकविण्यासाठी नितीन वसंत तायडे याने त्याचे ओळखीचा ऋषीकेश उर्फ बंटी बापु चित्ते वय-20 वर्षे रा.वाघेश्वरी माता मंदीराजवळ ,कुसुंबा ता.जि.जळगाव याचे ताब्यात सदर गुन्ह्यातील जप्त केलेले देशी बनावटीचे पिस्टल (त्याचे मॅगजीनमध्ये 02 जिवंत काडतुस असलेले) देवुन सदर पिस्टल हे राहुल पाटील याचे रिक्षात लपवून ठेवण्यास सांगीतल्याने ऋषीकेश उर्फ बंटी याने दिनांक 28/03/2025 रोजीचे रात्री 02.00 वाजेचे सुमारास राहुल पाटील याचे घराजवळ जाऊन सदर पिस्टल हे त्याचे मालकीचे ॲटोरिक्षा रजी.नं. MH19CW610 मध्ये ड्रायव्हर सिटचे खाली स्टेपनी ठेवण्याचे बॉक्समध्ये लपवून ठेवली व कुसुंबा येथील एका हॉटेल चालकापर्यंत राहुल पाटील याचे रिक्षात देशी कट्टा असल्याची माहीती पोहच केली. सदर हॉटेल चालक का पोलीस मित्र असल्याने त्याने पोलीसाना सदर रिक्षाबाबत गोपनीय माहीती दिल्यानंतर सदरची कारवाई सदर बाब ही तांत्रीक तपासाअंती उघड झाल्याने आरोपी नितीन वसंत तायडे व ऋषीकेश उर्फ बंटी बापु चित्ते यांना ताब्यात घेवून चोकशी केली असता संगनमताने सदर रिक्षात देशी कट्टा व राउंड ठेवल्याची कबुली दिली.

सदर रिक्षाचालक राहुल रंगराव पाटील यास भविष्यात आर्म ॲक्ट कायद्याखाली अटक होवून शिक्षा व्हावी या दृष्टीने फौजदारीपात्र कट रचून संगनमताने त्याचेविरुध्द खोटा पुरावा रचल्याचे दिसून आल्याने सदर गुन्ह्यास भारतीय न्याय संहीता कलम 61(2) ,229(1),3(5) हे वाढीव कलम लावण्यात आलेले असुन आरोपी नितीन वसंत तायडे व ऋषीकेश उर्फ बंटी बापु चित्ते यांना अटक करण्यात आलेली असुन त्यांना 05 दिवसाची पोलीस कस्टडी सुनावलेली आहे. तसेच राहुल रंगराव पाटील यास मा.न्यायालयाने जामीन दिलेला आहे. सदरची कार्यवाही श्री. रंगनाथ धारबळे यांचे नेतृत्वाखाली सपोनि साजीद मंसुरी, पोलीस उपनिरीक्षक योगेश ढिकले, पोना 3068 किरण वानखेडे ,पोकॉ 2001 विकी इंगळे, पोकॉ 936 रविंद्र साबळे यांनी केलेली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास शनिपेठ पो.स्टे.चे पोलीस उपनिरीक्षक योगेश ढिकले हे करीत आहे.

पोलीस निरिक्षक शनिपेठ पो.स्टे.जळगाव

रंगनाथ धारबळे
पोलीस निरीक्षक
शनिपेठ पो.स्टे.,जळ...